# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### मुंबईतील सहा किल्यासाठी एकत्रित विकास आराखडा तयार करणेबाबत

**(१) ३७७६३ (१२-०४-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सेंट जॉर्ज, शिवडी, वरळी, माहीम, धारावी आणि वांद्रे येथील किल्ल्यांचा विकास शासकीय निधी व बाह्य स्त्रोताव्दारे करण्याचा निर्णय सांस्कृतिक विभागाने घेतला असुन याकरीता एक समन्वय समिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील सहा किल्ल्यांचा एकत्रित विकास आरखडा तयार करण्याचे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ५ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत संबधित अधिका-यांना दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त किल्ल्यांचा एकत्रित विकास आराखडा तयार करण्याकरीता वास्तुविशारदाची नियुक्ती करण्यात आली असून सदर आराखडे तयार करण्याचे काम पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय स्तरावर सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सहा किल्याच्या एकत्रिक विकास आराखडा तयार करुन सदर किल्ल्यांचा विकास करण्यास किती कालावधी लागणार आहे?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०२-२०२३) :** (१)अंशत: खरे आहे,

प्रश्नाधीन राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन व संवर्धनासाठी शासकीय निधीसह जिल्हास्तरावर बाह्यस्त्रोतामार्फत निधी प्राप्त व्हावा या उद्देशाने प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा महावारसा सोसायटी स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

प्रश्नाधीन ६ किल्ल्यापैकी

१) सेंट जॉर्ज किल्ल्याचे काम निविदा स्तरावर आहे.

२) शिवडी किल्ल्याच्या जतन दुरुस्ती कामाची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

३) वांद्रे किल्ल्याच्या जतन दुरुस्तीचे काम १२ वा वित्त आयोगातून करण्यात आले आहे.

४) वरळी किल्ल्याच्या जतन दुरुस्ती, सुशोभिकरणाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिके मार्फत करण्यात येत आहे.

५) माहिम किल्ल्यातील अतिक्रमण काढण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असून ते पूर्ण झाल्यावर जतन दुरुस्ती कामाचा आराखडा तयार करण्यात येणार आहे.
(६) धारावी किल्ल्याचे काम सुरु होते. तथापि तांत्रिक करणास्तव उर्वरित काम आहे त्या स्थितीत थांबविण्यात आले आहे. या किल्ल्याच्या तटबंदीलगतची अतिक्रमणे काढण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

---

**तत्कालीन प्रांताधिकारी भिवंडी यांनी आपल्या अधिकाराचा केलेला गैरवापर**

**(२) ४०५४६ (११-०४-२०२२). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी ग्रामिण विधानसभा मतदार संघातील १२ गावांमधील मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय हायस्पीड रेल्वे प्रकल्पातर्गत मौजे मालोडी सर्वे नं.१०५/१० जुना सर्वे नं. ८८/१०/ अचा शासकिय जमीनीचा मोबदला रक्कम रू. ४,०७,१५,०४५/- (अक्षरी चार कोटी सात लाख पंधरा हजार पंचेचाळीस मात्र ) काही खाजगी खातेदारांच्या नावे वितरीत केले आहे , हे खरे आहे काय,
(२) तसेच,. तत्कालीन प्रांताधिकारी भिवंडी यांनी त्यांच्याकडील आदेश क.बी.डी. / भुस / हायस्पीड रेल्वे / थेट खरेदी / कावि १ ९ ५ / १ ९ दि .१४/०८/२०१ ९ अन्वये अदा करण्याचे निर्गमित केलेले आहेत . सदरचा सर्वे नं . १०५/१० व १०५/१०/ अ हे उपअधिक्षक भूमी अभिलेख भिवंडी यांचेकडुन गोळा न दर्शविण्यात आले असतानाही , प्रांताधिकारी यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून व स्वतःच्या आर्थिक फायदयाकरीता काही खाजगी खातेदाराशी संगनमत करून सर्वे नं .१०५/१०/ अ या मध्य रेल्वेच्या मालकीच्या असलेल्या सर्वे नबरचा मोबदला खाजगी खातेदाराना अदा केले आहे हे ही खरे आहे काय ,
(३) तसेच, श्री .मोहन नळदकर यांच्याविरुद्ध मा. उच्च न्यायालय मुंबई येथे जनहित याचिका के.पी.आय.एल. (एस. टो) १०१८/२०२१ ( सो ) दिनांक ३० एप्रिल, २०२१ रोजी दाखल करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त विषयाची दखल घेवुन शासकिय निधीचा मोठ्या प्रमाणावर अपहार केल्याने फौजदारी प्रक्रिया दडसहिता १९७३ चे कलम १९७ अन्वये तत्कालीन प्रांताधिकारी भिवंडी श्री. नळदकर यांच्याविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद आहे काय, असल्यास त्यांचेवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०२-२०२३) :** (१) मुंबई-अहमदाबाद हायस्पिड रेल्वे प्रकल्पांतर्गत मौजे मालोडी सर्व्हे नं. ८८/१० (नविन सर्व्हे नं.१०५/१०) या खाजगी जमिनीचा थेट खरेदी द्वारे मोबदला रु. ४,०७,१५,०४५/- संबधित खातेदारांना वितरीत केला आहे.
(२) नाही; विषयांकीत सर्व्हे क्रमांकातील व हिश्याचे गट बुक उपलब्ध नसल्याने व कम दर तक्ता पुर्णत: फाटलेला असल्याने प्रकल्पासाठी आवश्यक क्षेत्र नेमके कोणत्या ७/१२ मधून संपादीत करावयाची आहे याचा बोध होत नसल्याने तहसिलदार भिवंडी यांचे अध्यक्षतेखाली समीती नेमून क्षेत्र निश्चित बाबत आदेश दिले होते. सदर समितीच्या अहवालानुसार उपअधिक्षक भुमी अभिलेख यांनी फेर तपासणी करुन दूरुस्ती विवरणपत्र मो.र.क्र.१४६/२०१८ प्रमाणे सर्व्हे क्र ८८/१० ऐवजी सर्व्हे क्र.८८/१०/अ प्रकल्पासाठी बाधीत होत असल्याचे कळवले आहे. सदर ८८/१०/अ क्षेत्र रेल्वेच्या मालकीचे आहे, व सदर क्षेत्राचा मोबदला या प्रकरणी वाटप झालेला नाही. यास्तव चुकीने खरेदी केलेल्या (सर्व्हे क्र. ८८/१०) क्षेत्राची आवश्यकता नसल्याचे कारणास्तव सदर जमिनीचा (सर्व्हे क्र.८८/१०) चा मोबदला परत घेण्याची कार्यवाही चालू आहे.
(३) हे, खरे नाही.
४) सदर प्रकरणी चूकीच्या जमिनीचे संपादन झाल्याप्रकरणा संदर्भात संबधितां विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

---

**साखरी आगर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील मच्छीमार जेटीच्या उभारणीबाबत**

**(३) ४४७७४ (०६-१०-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरीआगर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील सुमारे १० वर्षांहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या मच्छीमार जेटीच्या उभारणीबाबत दिनांक ४ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत बैठक झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बैठकीत जेटीच्या कामासाठी आवश्यक रुपये ८.४३ कोटी इतकी रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाने किनारी अभियंता यांना तात्काळ उपलब्ध करुन देण्याचा निर्णय झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बैठकीतील निर्णयानुसार व आदेशानुसार कार्यवाही होवून जेटीच्या कामाला सुरुवात झाली आहे काय व कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

तत्कालिन मा.उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक ४/०४/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये मा.उपमुख्यमंत्री यांनी किनारी अभियंता यांनी काम पूर्ण करावे व याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाने निधी उपलब्ध करून द्यावा असे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने रू.८.४३ कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तसेच या कामाला जुलै, २०२२ च्या पुरवणी अर्थसंकल्पामध्ये समावेश करण्यात येऊन त्यास नाममात्र आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २०/०७/२०२२ च्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित राज्यस्तरीय योजनेतंर्गतच्या कामांना स्थगिती देण्यात आली आहे. त्यामध्ये सदर कामाचा समावेश आहे. त्यामुळे सदर कामाबाबत पुढील कार्यवाही करता आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोरिवली पश्चिम, मुंबई येथील क्रेमलिन स.गृ.संस्थेस अभिहस्तांतरण प्रमाणपत्र विलंब होत असल्याबाबत**

**(४) ४६२१३ (०६-१०-२०२२). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रेमलिन स.गृ.संस्था, सीटीएस क्रमांक २६१, सर्व्हे क्रमांक ३७, बोरीवली पश्चिम या संस्थेने जमीन अभिहस्तांतरित करुन मिळावी म्हणून उपजिल्हा निबंधक - ४, मुंबई यांचेकडे दिनांक ३१ ऑगस्ट, २०१३ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने त्यानुसार जमीन अभिहस्तांरण प्रकरण प्रलंबित ठेवल्याप्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्याही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, क्रेमलिन स.गृ.संस्थेस लवकरात लवकर अभिहस्तांतरण प्रमाणपत्र देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०२-०३-२०२३) :** (१) संस्थेची मागणी दि.३१.८.२०१३ ची नसून संस्थेने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४), मुंबई यांचेकडे दि.११.१२.२०१४ रोजी अर्ज दाखल केला आहे.

(२) व (३) व (४) मानीव अभिहस्तांतरणबाबत अर्ज प्राप्त झाल्यावर अर्जाबाबत चौकशीची बाब महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ नुसार निबंधकांना प्राप्त अधिकारातील असल्याने शासन स्तरावरुन चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. संस्थेचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४), मुंबई यांचे कार्यालयाकडून सदर अर्जाची व त्यासोबतच्या कागदपत्रांची "मोफा" अधिनियमातील तरतूदीनुसार छाननी करण्यात आली व अर्जदार यांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली नसल्यामुळे दि.१४.१.२०१५ रोजी नमुना नं.८ मध्ये नोटीस काढून अर्जदार यांना पूर्ततेसाठी कळविण्यात आले होते. तदनंतर अर्जदार यांनी दि.३.३.२०१५ रोजी पूर्ततेबाबत अहवाल सादर केल्यानंतर संबंधित अर्जदार व प्रतिवादी यांना दि.२३.४.२०१५ रोजी नमुना १० मध्ये सुनावणी नोटीस जारी करण्यात आली होती. सदर अर्जावरील सुनावणी प्रक्रिया पुर्ण होऊन दि.७.१.२०१६ रोजी सर्व पक्षकारांना लेखी युक्तीवाद दाखल करण्यासाठी १० दिवसांची मुभा देण्यात येऊन धारीका निर्णयास्तव बंद करण्यात आली होती. सदर धारीकेवर आदेश पारित झालेले नसल्याने तसेच दरम्यान सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक यांची बदली झाल्यामुळे सदर अर्जावरील पुढील कामकाज करण्याकरीता जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४), मुंबई या कार्यालयामार्फत रुजू झालेल्या उप निबंधकांसमोर दि.३०.११.२०२२ रोजी संबंधित अर्जदार व पक्षकार यांना सुनावणीची नोटीस काढण्यात आली आहे. सदर अर्जावरील सुनावणी दि.१९.१२.२०२२ व दि.१९.१.२०२३ रोजी घेण्यात आलेली आहे. सुनावणी दरम्यान अर्जदार संस्था, प्रतिवादी क्र.७ यांचे कायदेशीर वारसदार व प्रतिवादी क्र.१४, १५ यांच्या वतीने त्यांचे वकील उपस्थित होते. प्रतिवादी क्र.७ मयत असल्याने त्यांचे कायदेशीर वारस यांच्या वकीलांनी निदर्शनास आणून दिले. दि.१९.१.२०२३ च्या सुनावणीवेळी प्रतिवादी क्र.७ यांचे वकीलांना मयत प्रतिवादी क्र.७ यांचे कायदेशीर वारसांची नावे व पत्ते देण्याबाबत सूचित करण्यात आले व वारसांची नावे मिळाल्यानंतर त्यानुषंगाने आवश्यक तो दुरूस्ती अर्ज दाखल करणेबाबत अर्जदार संस्थेस निर्देश देण्यात आले आहेत. सदर प्रकरणाची पुढील सुनावणी दि.९.२.२०२३ रोजी ठेवण्यात आली आहे. सुनावणीचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

**महागांव (जि.यवतमाळ) तालुक्यात रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड करणा-या सामाजिक वनीकरण विभागाने रोजगार हमी योजनेची मागील दोन वर्षातील कामाची माहिती न दिल्याबाबत**

**(५) ४६८१९ (२१-०९-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव (जि.यवतमाळ) तालुक्यात रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड करणा-या सामाजिक वनीकरण विभागाने रोजगार हमी योजनेची मागील दोन वर्षातील कामाची माहिती दिली नसल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वर्षात काही रोजगार सेवकांच्या मध्यस्थीने मजूरांच्या नावे रक्कम काढून त्यातील काही हिस्सा मजूराला देत नसल्याचे प्रकारही घडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.

सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, पुसद अंतर्गत महागांव तालुक्यात सन २०१८ मध्ये धारमोहा ते मुडाना रस्ता दुतर्फा ०५.०० कि.मी. क्षेत्रावर रोपे संख्या-२५०० लागवड करण्यात आली. सदर रोपवन क्षेत्र दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी तीन वर्षाचा कालावधी संपल्यानंतर सार्वजनिक बांधकाम उपविभाग, महागांव यांना हस्तांतरीत करण्यात आले. सदर रोपवन स्थळांची नोंद वन विभागाच्या www.mahaforest.gov.in आणि nrega.nic.in या संकेतस्थळांवर करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतंर्गत करण्यात येणारी कामे ही रोजगार सेवकांमार्फत करण्यात येतात. रोजगार

सेवक गटविकास अधिकारी यांच्या अधिनस्त काम करतात. वन विभागाच्या कामांसाठी आवश्यक असणाऱ्या मजुरांची मागणी रोजगार सेवकांकडे नोंदविण्यात येते. मजुरांकडून करण्यात आलेल्या कामाची तपासणी वनरक्षकांमार्फत करण्यात येते. त्यानंतर वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेमार्फत मजुरांच्या मजुरीची रक्कम ही त्यांच्या बँक खात्यात ऑनलाईन पध्दतीने जमा करण्यात येते.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शासनाने कलावंत व कला संस्थांना जाहिर केलेले अनुदान

**(६) ४७०९१ (०९-१०-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने कलावंत व कला संस्थांना ३५ कोटी रुपयाचे कोविड विशेष अनुदान जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यानुसार यवतमाळ जिल्हयातील किती कलावंत व कला संस्थांना या योजनेचा लाभ मिळाला आहे,
(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कोरोना पार्श्वभूमीवर अर्थसहाय्य या योजनेंतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील एकूण ६९ एकल कलाकारांना तसेच २ कला संस्थांना या योजनेचा लाभ मिळालेला आहे.
(३) शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण ८२२०/प्र.क्र.१४७/ भाग-२/सां.का.४, दिनांक ७ ऑक्टोबर, २०२२ अन्वये जास्तीत-जास्त कलाकारांना या योजनेचा लाभ व्हावा, याकरीता सदर योजनेस मार्च, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

---

### साकळी (ता. यावल, जि.जळगाव) येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(७) ४७९१३ (२८-१०-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साकळी (ता. यावल, जि.जळगाव) येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतीची दुरवस्था झाली असून ती कोसळण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे दिनांक २७ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना जनावरांचे लसीकरण, औषधोपचार इ.सह शासनाच्या असलेल्या इतर योजनांची अंमलबजावणी करताना अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, उक्त दवाखान्यात दिड वर्षापासून शिपाई पद रिक्त आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात शासनाने महिती घेऊन सुसज्ज पशुवैद्यकीय केंद्र उभारण्यासह येथील उक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०१-०३-२०२३) :** (१) व (२) पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ साकळी, ता. यावल, जि. जळगांव येथील इमारत ४० वर्षापूर्वीची असून जीर्ण झालेली असल्याने वापरण्यास योग्य नसल्याचे उपअभियंता बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, रावेर यांनी कळविले आहे. तथापि, या इमारतीमधील सुस्थितीत असलेल्या काही कक्षामध्ये पशुवैद्यकीय दवाखाना सुरु असून कामकाजामध्ये कोणताही अडथळा येत नाही.
(३) व (४) जिल्हा नियोजन समिती, जळगाव यांच्याकडे इमारत बांधकामासाठी प्रारुप सादर करण्यात आलेले आहे. तसेच शिपाई पदावर नियुक्ती करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद, जळगाव यांच्याकडून करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साखर उद्योग टिकून राहण्यासाठी इथेनॉल निर्मीतीवर भर देण्याबाबत

**(८) ४९४३७ (२९-०१-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशामध्ये साखर उत्पादनात महाराष्ट्र राज्य अग्रेसर असून साखर उद्योगामध्ये निर्माण होणाऱ्या पूरक पदार्थापासून इथेनॉल निर्मितीची पुरेशी व्यवस्था राज्यात उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नैसर्गीक आपत्तीसह प्रदूषण व अन्य समस्यांचा सामना करणाऱ्या साखर उद्योगाला टिकून रहाण्यासाठी इथेनॉल निर्मीतीवर भर देण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२०-२१ मध्ये ऑईल मार्केटिंग कंपन्यानी राज्यातील ७२ साखर कारखान्याना १०८ कोटी इथेनॉल पुरवठा करण्याचे उद्दिष्ट दिल्यानुसार साखर आयुक्त कार्यालयाने दिनांक २५ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये इथेनॉल निर्मिती असावणी प्रकल्प असलेल्या साखर कारखान्यांना उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०२-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र राज्यातील साखर उद्योगामध्ये इथेनॉल निर्मिती करण्यासाठी सध्या सहकारी (४२), खाजगी (४२), स्टैंडअलोन (३८) असे एकूण १२२ प्रकल्प कार्यान्वीत असून त्याची वार्षिक इथेनॉल निर्मिती २२६ कोटी लिटर इतकी आहे. साखर उद्योगाला टिकून राहण्याकरिता इथेनॉल निर्मितीवर भर देण्याची आवश्यकता विचारात घेता केंद्र शासनाने देशभरात इथेनॉल ब्लेडिंग प्रोग्राम अंतर्गत इथेनॉल निर्मिती करणाऱ्या प्रकल्पासाठी ६% व्याज अनुदान योजना सन २०१८ पासून सुरु केलेली आहे. वर्ष २०२०-२१ मध्ये ऑईल मार्केटिंग कंपन्यानी राज्यातील ७२ साखर कारखान्यांना १०८ कोटी लिटर इथेनॉल पुरवठा करण्याचे उद्दिष्टे दिल्यानुसार साखर आयुक्त कार्यालयाने दि. १६/११/२०२१ च्या पत्रान्वये इथेनॉल निर्मिती आसवणी प्रकल्प असलेल्या साखर कारखान्यांना दि. ३०/११/२०२१ पर्यंत जास्तीत जास्त इथेनॉलचा पुरवठा करण्याबाबत कळविले होते त्यानुसार राज्यातील सहकारी व खाजगी साखर कारखान्यांनी ७९ कोटी लिटर (७३.१४%) इतका इथेनॉल पुरवठा केला आहे. तसेच इथेनॉल वर्ष २०२१ २२ करिता राज्यातील ७४ सहकारी व खाजगी साखर कारखान्यांनी त्यांना दिलेल्या एकूण १२० कोटी लिटर इथेनॉल पुरवठयाच्या उद्दिष्टापैकी ९८ कोटी लिटर (८२.५%) इतका इथेनॉल पुरवठा केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य सहकारी दुध संस्था (महानंद) तोटयात असल्याबाबत

**(९) ५००६८ (२४-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ (महानंद) संस्थेच्या तोटयात सन २०२१ पासून सतत वाढ होऊन तोटा सध्या १५.४६ कोटी रुपयांपेक्षा अधिक वाढला असल्याचे दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानंदामधील आर्थिक स्थितीची चौकशी करण्यासाठी महानंदाचे संचालक मंडळ बरखास्त करण्याचा निर्णय शासनाने घेऊन त्याऐवजी प्रशासकाची नियुक्ती केली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासंदर्भात दुग्धव्यवसाय विकास मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली महानंदाचे माजी संचालक दुग्धविकास विभागाचे सचिव व आयुक्त तसेच डेअरीच्या संबंधित अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत, महानंदाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी व्यवस्थापन कामकाज राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डाकडे (एनडीडीबी) सोपविण्याबाबत निर्णय घेण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने महानंदाला आर्थिक सुस्थितीत आणण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०१-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
२) महासंघाची आर्थिक स्थिती व झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी दिनांक २३.८.२०२२ रोजीच्या आदेशान्वये महासंघाचे तत्कालिन संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, सद्यस्थितीत निवडणूक प्रक्रिया पूर्ण होऊन नवीन संचालक मंडळ अस्तित्वात आले आहे.
(३),(४) व (५) महासंघास उर्जितवस्था देण्यासाठी महासंघाचे व्यवस्थापन राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाबरोबर (एनडीडीबी) चर्चा करीत आहे.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये सहभागी शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपासून वंचित रहावे लागल्याबाबत

**(१०) ५०२६७ (१९-०१-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील महसूल खात्याच्या कामातील दिरंगाईमुळे ३८ मंडळातील भात कापणीचे प्रयोग करण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) तसेच अहवाल सादर करण्याची मुदत संपून एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी उलटून गेला तरीही महसूल खात्याने अद्याप अहवाल सादर न केल्याने प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये सहभागी झालेल्या ९ हजार ५०० शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपासून वंचित रहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वेळेत भात कापणीचे प्रयोग करुन अहवाल सादर न करणाऱ्या महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, याबाबत शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित राहू नयेत याकरीता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०१-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.
खरीप हंगाम २०२२ करीता सिंधुदुर्ग जिल्ह्यात महसूल यंत्रणा, जिल्हा परिषद यंत्रणा व कृषी विभाग या तीनही यंत्रणांचे मिळून भात पिकाचे ६८२ पिक कापणी विश्लेषीत झाले आहेत.
(२) हे खरे नाही.
खरीप हंगाम २०२२ मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यात भात पिकाकरिता ९४८४ शेतकरी अर्जदारांनी सहभाग घेवुन १५३७.९१ हे. क्षेत्र विमा संरक्षीत केले आहे. उत्पादनावर आधारीत नुकसान भरपाईच्या परिगणनेची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उदगीर (जि.लातूर) तालुक्यातील ऐतिहासिक किल्ल्यांच्या ढासळलेल्या बुरुजांची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(११) ५०३५२ (२४-०१-२०२३). श्री.संजय बनसोडे (उदगीर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) तालुक्यातील ऐतिहासिक किल्ल्याचा तेलींग बुरुज पावसामुळे ढासळून पडल्याचे दिनांक ५ ऑगस्ट्र, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर किल्ल्याचा बुरुज ढासळल्यामुळे तेथील उदगीरबाबा मंदिराकडे जाण्या-येण्याचा मार्गच बंद झाल्याने भाविकांना तसेच पर्यटकांना मंदीरातील देवदर्शन व पर्यटनस्थळांना भेटी देणे अडचणींचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१२ या कालावधीमध्ये उक्त ऐतिहासिक किल्ल्याची डागडुजी करण्यासाठी पूर्वी रुपये १२ लाख खर्च केला असल्याचे दिनांक ९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तेथील मंदिर मार्गावरील बुरुजाचे पडलेले दगड-गोटे काढून मंदिराकडे जाण्याचा मार्ग सुरु करण्यात यावा व ढासळलेल्या बुरुजाची पुनर्बांधणी करण्यात यावी, अशी मागणी तेथील ग्रामस्थ, भाविक व पर्यटकांनी शासनाकडे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बुरुजाची बांधणी करून रस्ता खुला करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०२-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे. तथापि, तेलींग बुरुजाचा भाग ढासळल्याचे निदर्शनास आल्यानंतर सहायक संचालक, औरंगाबाद यांच्याकडून उदगीरीबाबा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर जो मलबा पडला होता, तो मलबा तात्काळ हटवून रस्त्याचे काम पूर्ण करुन भाविकांकरीता रस्ता सुरु करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) अशा स्वरुपाची मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोहमारा (ता.सडक-अर्जुनी, जि.गोंदिया) येथे वन आगारात बांबू उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१२) ५०४४५ (१९-०१-२०२३). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोहमारा (ता.सडक-अर्जुनी, जि.गोंदिया) येथे वन आगारात वर्षभर रोजगार उपलब्ध होण्याकरिता बांबू उपलब्ध होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वन विभागास विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वन आगारात वर्षभर रोजगार उपलब्ध नसल्याने अनेक बांबू उद्योगावर अवलंबून असणाऱ्या नागरीकांना बांबू उपलब्ध होत नसल्याने उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी उपवनसरंक्षक गोंदिया वन विभागास दिनांक १३ एप्रिल, २०२२ व २७ एप्रिल, २०२२ रोजीच्या पत्राव्दारे बांबू उपलब्ध होण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सुचित करुनही ते उपलब्ध करुन दिले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बुरड कामगारांवर अन्याय होत असल्याने वन विभागाप्रती असंतोष व्यक्त केला आहे, तसेच वन विभागाने सदर प्रकरणाची दखल घेऊन कोहमारा वन आगारात बांबू उपलब्ध करण्याची योजना आखली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे
(४) वनआगार अधिकारी, प्रा.डोंगरगांव यांचे अहवालानुसार तेंदू संकलनामध्ये मजुर वर्ग व्यस्त असल्याने बांबुची चढाई व उतराई करणेकरिता मजुर तसेच वाहतुकीकरिता ट्रक उपलब्ध न झाल्याने कोहमारा आगारात बांबु वाहतुक झाली नाही. मात्र आता सन २०२२-२३ मध्ये एकूण ८५८० नग लांब बांबु कोहमारा आगारात आवक झाले असून, त्यापैकी बुरड कामगारांच्या मागणी प्रमाणे ६४०० नग लांब बांबु वाटप करण्यात आला आहे व आजमितीस कोहमारा आगारात २१८० नग लांब बांबु शिल्लक आहेत. बुरडांची मागणी आल्यास तेही संबंधितांना वाटप करण्यात येतील.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात खुल्या साखर निर्यात धोरणात बदल करुन कोटा पध्दती लागू करण्याचा प्रयत्न केंद्र शासनामार्फत सुरु असल्याबाबत

**(१३) ५०४४७ (१९-०१-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खुल्या साखर निर्यात धोरणात बदल करीत कोटा पध्दती लागू करण्याचा प्रयत्न केंद्र शासनामार्फत सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर साखर उत्पादनात यंदा ब्राझिलची मक्तेदारी मोडीत जगात भारताने तर देशात उत्तर प्रदेशची मक्तेदारी मोडीत काढत महाराष्ट्राने अव्वल स्थान पटकावले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी केंद्र सरकारच्या प्रचलित खुल्या साखर निर्यात धोरणानुसार राज्यातील साखर कारखान्यांनी यंदा मोठ्या प्रमाणात साखर निर्यात केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात खुल्या साखर निर्यातीचे धोरण बदलून कोटा पध्दती लागू करण्यामागील कारणे कोणती आहेत तसेच कोटा पध्दतीमुळे देशासह सर्वच कारखान्यांना साखर निर्यातीसाठी कोटा मिळणार असून सर्वाधिक फटका राज्यातील साखर उद्योगाला बसणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२८-०२-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) साखर निर्यातीबाबतचे धोरण केंद्र शासनामार्फत ठरविले जाते. गाळप हंगाम २०२१-२२ साठी केंद्र शासनाने साखर निर्यातीबाबत खुल्या पध्दतीने साखर निर्यातीचे धोरण निश्चित केले होते.
त्यानुसार महाराष्ट्रातील साखर कारखान्यांकडून ६० लाख मे.ट. साखर निर्यात करण्यात आली. तसेच सन-२०२२-२३ संदर्भात याकाळातील साखर कारखान्यांनी ६० लाख मे.ट. निर्यात कोटा ठरविण्यात आलेला आहे.
त्यापैकी महाराष्ट्रासाठी २१.३८ लाख मे.ट. निर्यात कोटा देण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मंडळ अधिकाऱ्यांची पदे भरण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(१४) ५०४८३ (२०-०१-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५१८ मंडळ अधिकाऱ्यांची पदे भरण्याचा निर्णय महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने मंडळ अधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे आदेश काढण्यात आले आहेत काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०१-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.प्राफेब-२०१० (तलाठी)/प्र.क्र.११२(भाग-३)/म-१०, दि.०७.१२.२०२२ अन्वये राज्यातील ५१८ महसूल मंडळ कार्यालयांसाठी ५१८ मंडळ अधिकारी यांची पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) सेवा प्रवेश नियमानुसार मंडळ अधिकाऱ्यांची पदे ही तलाठी संवर्गातून पदोन्नतीने भरण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरून महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि.०७.१२.२०२२ अन्वये, निर्माण करण्यात आलेली महसूली विभागनिहाय ५१८ मंडळ अधिकाऱ्यांची पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेमळ (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथे फळपीक विमा योजना लाभार्थी शेतकऱ्यांना शासकीय यंत्रणा व विमा कंपनीने तुटपुंजी नुकसान भरपाई दिल्याबाबत**

**(१५) ५०५३० (१९-०१-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेमळ (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदूर्ग) येथे हवामानावर आधारित फळपीक विमा योजना लाभार्थी शेतकऱ्यांना तापमानाचा फटका बसूनही शासकीय यंत्रणा व विमा कंपनीने तुटपुंजी नुकसान भरपाई देऊन शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच फळपीक विमा योजनेच्या लाभार्थी शेतकऱ्यांना विमा लाभ न मिळाल्यास आंदोलन करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांना माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२७-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) निरवडे महसुल मंडळातील सहभागी सर्व शेतकऱ्यांना सावंतवाडी महसुल मंडळातील स्वयंचलित हवामान केंद्राच्या आकडेवारीनुसार नुकसान भरपाई देणेबाबतच्या सूचना मा. अध्यक्ष, जिल्हास्तरीय समिती तथा जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांनी संबंधीत विमा कंपनीस दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील रणकोळ, कवाडा, वडवली, दाभोण, ऐना या गावातील आदिवासी शेतकऱ्यांची जमीन मुंबई-वडोदरा एक्सप्रेसवेसाठी संपादीत केल्याबाबत**

**(१६) ५०७११ (२०-०१-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील रणकोळ, कवाडा, वडवली, दाभोण, ऐना या गावातील आदिवासी शेतकऱ्यांची जमीन मुंबई-वडोदरा एक्सप्रेसवेसाठी शासनाने संपादित केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जमिनीवर फळझाडे व वनझाडांचा मोबदला अद्यापही शेतकऱ्यांना देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शेतकऱ्यांना फळझाडे व वनझाडांचा मोबदला देण्याबाबत प्रांत अधिकाऱ्यांच्या कार्यालयात सुनावणी होऊन अद्याप त्यांना पैसे देण्याचे टाळण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२७-०२-२०२३) :**
१) हे खरे आहे.
२),३),४) व ५) या प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या संबंधातील ज्या आदिवासी शेतकऱ्यांनी K.Y.C. साठी आवश्यक ती कागदपत्रे सादर केली आहेत, त्यांना फळझाडे व वन झाडांचा मोबदला अदा करण्यात आला आहे.
ज्या आदिवासी शेतकऱ्यांनी K.Y.C. साठी आवश्यक ती कागदपत्रे अद्यापपर्यंत सादर केलेली नाहीत, अशा शेतकऱ्यांची कागदपत्रे प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही संबधित तलाठी यांचेमार्फत चालु आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांकडून अशी कागदपत्रे प्राप्त होताच, त्यांना वनझाडे/फळझाडांचा मोबदला वाटप करण्यात येईल.

---

## लातूर येथील रेल्वे विभागाने महाराष्ट्र शासनास दिलेल्या जागेच्या बदल्यात पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१७) ५०८४१ (२४-०१-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर येथील रेल्वे विभागाने महाराष्ट्र शासनास दिलेल्या जागेच्या बदल्यात पर्यायी जागा उपलब्ध करुन दिली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लातूर येथील जुने रेल्वे स्टेशन ते हरंगुळ रेल्वे स्टेशनच्या ३२.८१ हे.आर. जागेच्या बदल्यात रेल्वे विभाग, भुसावळ यांनी उस्मानाबाद जिल्ह्यातील ४१.०९ हे.आर. व सोलापूर जिल्ह्यातील २२.९० हे.आर. या जमीनीची मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त समस्या लक्षात घेता येथील रेल्वे विभागाला पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) लातूर येथील रेल्वे विभागाने महाराष्ट्र शासनाच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अंतर्गत अतिविशेष उपचार रुग्णालयासाठी दिलेल्या जमिनीच्या बदल्यात पर्यायी जमीन देण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

उपमुख्य अभियंता केंद्रीय रेल्वे, भूसावळ यांनी उस्मानाबाद जिल्ह्यात ४१.०९ हे.आर व सोलापूर जिल्ह्यात २२.९० हे.आर जमीन देण्याची विनंती केली आहे, हे खरे आहे.

मा.मंत्री (महसूल) यांनी मध्य रेल्वेचे अधिकारी आणि मध्य रेल्वेचे अधिकारी आणि संबंधित जिल्हाधिकारी यांची दि.२०.०५.२०२१ रोजी बैठक घेतली. त्या बैठकीमधील निर्देशानुसार जागेची उपलब्धता आणि अधिकार अभिलेखांची तपासणीबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडून समन्वय आणि पुढील आवश्यक ती कार्यवाही चालू आहे. याबाबतीत जिल्हाधिकारी, पुणे यांचा समन्वये अहवाल / प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पीत आहे.

---

### राज्यात सेंद्रीय शेतीतून उत्पादित मालांना योग्य भाव मिळण्याबाबत

**(१८) ५१०४० (१९-०१-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेती करण्यासाठी शासन आग्रही असले तरी सेंद्रिय शेती करणे शेतकऱ्यांना परवडत नसून सेंद्रिय शेतातील उत्पादकतेमध्ये २५ ते ३० टक्के घट असल्याने उत्पादित मालाला योग्य बाजारपेठ मिळत नसल्यामुळे सेंद्रिय शेती करणे शेतकऱ्यांना अडचणीचे ठरत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कोल्हापूर जिल्ह्यात योग्य बाजारपेठ मिळत नसल्यामुळे एकूण पिकाऊ क्षेत्र चार लाख हेक्टर असले तरी ७४० हेक्टर जमिनीवरच सेंद्रिय शेती केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार राज्यात सेंद्रीय शेतीतून उत्पादित मालांना योग्य भाव मिळण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२७-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) परंपरागत कृषि विकास योजने अंतर्गत सेंद्रिय शेती गटामार्फत उत्पादित केलेल्या सेंद्रिय शेतमालाला रास्त भाव मिळण्याकरीता पॅकिंग व ब्रॅडिंग करुन शेतमाल विक्री करण्यात येतो. कोल्हापूर जिल्ह्यात सदर योजने अंतर्गत चिकोत्रा, दुधगंगा, कासारीखोरे, श्रीसिध्देश्वर इत्यादि ब्रँड विकसित करुन त्यांच्या मार्फत विक्री करण्यात येते. यासाठी गटातील शेतकऱ्यांना योजनेतून पॅकेजिंग साहित्य (प्रिंटिंगसह), धान्य बॅग पुरवठा इत्यादि बाबींचा लाभ देण्यात आलेला आहे.

तसेच सदर सेंद्रिय उत्पादित शेतमालाच्या विपणनाकरीता शेतकरी मेळावे, जिल्हा कृषि महोत्सव, तालुकास्तरीय कृषि प्रदर्शने, सेंद्रिय शेती मेळावे, पिकेल ते विकेल मोहिमेअंतर्गत विक्री व्यवस्था उपलब्ध करुन देण्याचे कृषि विभागामार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. सेंद्रिय मालाच्या विक्री करीता मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प(स्मार्ट), महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रोजेक्ट (मॅग्नेट) इत्यादी योजनांच्या अभिसरणाद्वारे मुल्यसाखळी विकसित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर शहराला वेढून असलेल्या किल्ल्याला अनेक ठिकाणी तडे जाऊन पावसामुळे बुरुज कोसळला असल्याबाबत

**(१९) ५१०७६ (२५-०१-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहराला वेढून असलेल्या किल्ल्याला अनेक ठिकाणी तडे जाऊन पावसामुळे बुरुज कोसळला असल्याचे माहे ऑगस्ट ते सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त किल्ल्याची डागडुजी व सुशोभिकरण करण्याकरिता पुरातत्व विभाग व पर्यटन विभागाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) प्रश्नाधीन किल्ला केंद्र शासनाचे संरक्षित स्मारक असून भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ, नागपूर मंडळ यांच्या अखत्यारीत आहे. या किल्ल्याची भिंत अनेक ठिकाणी क्षतिग्रस्त झाली आहे. तसेच, अतिवृष्टीमुळे या किल्ल्याच्या भिंतीमधील हनुमान खिडकीचा भाग क्षतिग्रस्त झाला आहे. या किल्ल्याच्या जतन व संवर्धनाचे काम भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ, नागपूर मंडळ यांच्यातर्फे प्रगतिपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोताळा (जि.बुलढाणा) येथील पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेंतर्गत शेतकऱ्यांची यादी अद्ययावत करण्याबाबत**

**(२०) ५१२८६ (१९-०१-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोताळा (जि.बुलढाणा) येथील ईश्वर सेवा केंद्र या ठिकाणी पंतप्रधान किसान योजनेंतर्गत नोंदणी करणाऱ्या केंद्र संचालकांने शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात संबंधित केंद्रावर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२७-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
ईश्वर ई सेवा केंद्र चालक यांचेवर नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत जिल्हा समन्वयक सि. एस. सि. बुलढाणा यांना कळविण्यात आले त्यानुसार जिल्हा समन्वयक सी. एस. सी. बुलढाणा यांचे अहवालानुसार सदर केंद्र बंद करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीवर्धन, मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याकिल्ल्यांची पडझड झाल्याबाबत**

**(२१) ५१३०८ (२७-०१-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीवर्धन, मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील दिघी-राजपुरी खाडीच्या मुखासमोर असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्याची गाथा सांगणारा पद्मदुर्ग किल्ल्याची पडझड झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर किल्ला पाहण्याकरिता देशातील किंबुहना परदेशातील पर्यटक येत असल्याने या किल्ल्याला उच्च दर्जाचे पर्यटन स्थळ व्हावे, अशी मागणी इतिहासप्रेमींकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तसेच उक्त किल्ल्याची पुनर्बांधणी व पर्यटन स्थळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०२-२०२३) :**(१) होय. हे खरे आहे.

प्रश्नाधीन किल्ला केंद्र सरंक्षित स्मारक असून भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ यांचे अखत्यारीत आहे.

(२) होय. हे खरे आहे.

या किल्ल्याच्या संवर्धनासाठी व जेट्टी बांधण्याकरीता भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ यांच्याकडे मागण्या प्राप्त होत आहेत.

(३) या किल्ल्याच्या संवर्धनाकरीता भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ यांच्या जतन संवर्धनाच्या कार्यक्रमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे. याशिवाय किल्ल्याच्या तटबंदीवरील झाडे-झुडपे काढण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच किल्ल्यात साठलेला ढिगारा/मलबा हटविण्याचे कार्य देखील हाती घेण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर येथे सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी असलेला निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(२२) ५१४६७ (२७-०१-२०२३). श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे सांस्कृतिक संचालनालयाचे उपकेंद्र सुरु करण्यात आल्यानंतर गत चारवर्षात विविध सांस्कृतिक कार्यक्रमासाठी शासनाकडून ७७ लाख रुपये निधी प्राप्त झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निधीतून केवळ ६३ लाख रुपये निधी खर्च करण्यात आला तसेच १४ लाख रुपये निधी अखर्चित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही, शासनाकडून आस्थापना विषयक बाबीकरीता संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयाकरीता निधी वितरीत करण्यात आला होता. नागपूर येथील क्षेत्रिय कार्यालयाकरिता सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत गत चार वर्षात आस्थापना खर्चाकरीता रुपये ७७.०० लाख निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता.

(२) आस्थापना विषयक खर्च भागवून उर्वरित रक्कम त्या-त्या आर्थिक वर्षाअखेर शासन जमा करण्यात आलेली आहे.

(३) नाही. आस्थापना विषय खर्च असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

(४) लागू नाही.

---

### सब रजिस्ट्रार ऑफ इन्शुरन्स, अंधेरी डिव्हिजन कार्यालयाने प्रलंबित असलेल्या खटल्याशी संबंधित दस्तऐवज नोंदणी करण्यास दिलेल्या नकाराबाबत

**(२३) ५१५५७ (२९-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सब रजिस्ट्रार ऑफ इन्शुरन्स, अंधेरी डिव्हिजन कार्यालयाने प्रलंबित असलेल्या खटल्याशी संबंधित दस्तऐवज नोंदणी करण्यास नकार दिला परंतु त्याच प्रकारचे दस्तऐवज सब रजिस्ट्रार ऑफ इन्शुरन्स, बोरिवली यांच्या कार्यालयात नोंदणीकृत करण्यात आले, या संबंधित तक्रारदार यांनी माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान उपनिबंधक कार्यालय, अंधेरी यांच्याकडे लेखी तक्रार सादर केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सब रजिस्ट्रार ऑफ इन्शुरन्स, अंधेरी डिव्हिजन कार्यालयाकडून न्यायालयाचा आदेश असला पाहिजे तरच ते दस्तऐवज नोंदणी करतील, असा आग्रह धरला जातो. परंतु प्रत्यक्षात न्यायालयाच्या आदेशाची गरज नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०२-२०२३) :**(१) हे खरे नाही.
असे प्रकरण सह जिल्हा निबंधक, मुंबई उपनगर या कार्यालयात व कार्यालयाच्या अधिनस्त कार्यालयातही निदर्शनास आले नाही.
(२) हे खरे नाही.
सह जिल्हा निबंधक वर्ग-१, मुंबई उपनगर या कार्यालयाच्या अधिनस्त सह दुय्यम निबंधक कार्यालयांनी असा कोणताही दस्तऐवज नोंदणीस नाकारला नाही.
(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील पुरातत्व विभागात मनुष्यबळाची कमतरता असल्याने ऐतिहासिक स्थळांच्या संवर्धनातील अडचणीबाबत**

**(२४) ५१७९८ (२७-०१-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्याला त्रिरश्मी लेणी, जैन मंदिर, गोंदेश्वर मंदिर, ऐश्वर्यश्वर, मुक्तेश्वर, पेशवेकालीन सरकारवाडा, रंगमहाल, नीळकंठेश्वर मंदिर, सुंदरनारायण मंदिर व अंजनेरी या ऐतिहासिक स्थळांचा वारसा लाभलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त स्थळांचे संवर्धन करण्यासाठी पुरातत्व विभागात पुरेसे मनुष्यबळ नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक विभागातील पुरातत्व विभागात मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०२-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे. प्रश्नाधीन त्रिरश्मी लेणी, जैन मंदिर, गोंदेश्वर मंदिर, ऐश्वर्यश्वर ही स्मारके भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळाच्या अखत्यारीत आहेत व मुक्तेश्वर, पेशवेकालीन सरकारवाडा, रंगमहाल, नीलकंठेश्वर मंदिर, अंजनेरी येथील जैन लेण्या या राज्य संरक्षित स्मारके आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ३१.१०.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील आरे डेरीमधील कामगारांना वरळी डेअरी येथील जमीन देऊन कायमस्वरूपी घरे निर्माण करण्याबाबत**

**(२५) ५१९८३ (२९-०१-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील आरे डेरी मधील कामगारांच्या गृहनिर्माण संस्थेला वरळी डेअरी येथील मोकळी असलेली ५ एकर जमीन देऊन कामगारांसाठी कायमस्वरूपी घरे निर्माण करण्याबाबतचे निवेदन मा. मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री. दत्तसाईराज सहकारी गृहनिर्माण संस्था (नि.) महासंघ व महाराष्ट्र राज्य गुण नियंत्रक कर्मचारी संघटना यांनी तत्कालीन मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, दुग्धविकास मंत्री आणि प्रधान सचिव व आयुक्त, दुग्धविकास यांना सन १९८९ पासून कामगारांसाठी कायमस्वरूपी घरे देण्याबाबतचे निवेदन देत असूनही अद्याप या कर्मचाऱ्यांच्या घरांचा प्रश्न प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील इतर आस्थापनेत काम करीत असलेल्या कामगारांना (गिरणी कामगरांना तसेच माथाडी कामगारांना) शासन त्यांना कायमस्वरूपी घरे देत असतानाही आरे दुग्ध शाळेतील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासन असा निर्णय घेत असल्याने आरे दुग्ध शाळेतील कर्मचारी मागील ३० वर्षापासून आपल्या हक्काच्या घरापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,त्या नुसार दुग्ध शाळेतील कर्मचाऱ्यांना तातडीने घरे मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०२-२०२३) : (**१) (२) (३) (४) व (५)
होय, तथापि शासकिय कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी घरे देण्याचे शासनाचे कोणतेही धोरण नाही. त्यामुळे दुग्धशाळेतील कर्मचाऱ्यांना घरे उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील पर्जन्यमापक यंत्रणा नादुरुस्त असल्याबाबत

**(२६) ५२०५१ (२९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यात पावसाची मोजणी करण्यासाठी असलेले पर्जन्यमापक यंत्रणा नादुरुस्त असून सदर यंत्रणांची दुरुस्ती करणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासन नियमाप्रमाणे पर्जन्यमापक यंत्रणा ही मंडळाच्या ठिकाणी असून पाऊस हा बऱ्याचदा पर्जन्यमापक यंत्रणा असलेल्या गावाच्या ऐवजी इतर, तर कधी एकाच गावावर पडतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे पर्जन्यमापक यंत्रणेचा अहवाल दिल्याने चुकीचा अहवाल जाऊन शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यामुळे प्रत्येक तलाठी सज्जावर पर्जन्यमापक यंत्रणा बसवून कार्यान्वित करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२७-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
बीड जिल्हयामध्ये ६३ स्वयंचलित हवामान केंद्र कार्यरत असून सद्यस्थितीत बीड जिल्हयातील नेकनूर ता. बीड येथील हवामान केंद्र वगळता इतर सर्व हवामान केंद्र कार्यरत आहेत.
(२) अशी संभावना आहे.
(३) मा. स्थानिक लोकप्रतिनिधीद्वारे कृषी आयुक्तालय स्तरावर असे कोणतेही निवेदन प्राप्त नाही.
(४) १०००० ग्रामपंचायत स्तरावर वाढीव पर्जन्यमापक यंत्रे बसविणे शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयात नायब तहसिलदाराची पदे रिक्त असल्याबाबत

**(२७) ५२०५३ (२९-०१-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयात नायब तहसीलदाराची ६८ पदे असून पैकी ३४ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती विभागातील अनुषंगिक पदोन्नतीची प्रक्रीया ही गेल्या दोन वर्षापासून राबविली गेली नसल्याने ही पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जिल्हयात मंजूर पदापैकी निम्मी पदे रिक्त असल्यामुळे महसूल यंत्रणेवर कामाचा भार वाढला असून नागरीकांची कामे खोळंबली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त जिल्हयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२७-०२-२०२३) : (**१) अंशत खरे आहे. बुलढाणा जिल्ह्यात सध्यस्थितीत एकूण ६८ पैकी नायब तहसिलदारांची २७ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही.
सन २०२०-२१ या निवडसूची वर्षातील ४६ अव्वल कारकून/मंडळ अधिकारी यांना नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नती देवून त्यांच्या पदस्थापनेचे आदेश दिनांक २७.०७.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.
तसेच सन २०२२-२३ या वर्षाचा पदोन्नतीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडून मागविण्यात आला आहे.
(३) बुलढाणा जिल्ह्यातील रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिका-यांकडे सोपविण्यात आलेला आहे. त्यामुळे नागरिकांची कामे खोळंबली नाहीत.
(४) सन २०२२-२३ या वर्षाचा पदोन्नतीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडून मागविण्यात आला आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाची व शासन मान्यता घेऊन पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात येतील. सदर पदोन्नतीप्रस्तावामधून बुलढाणा जिल्ह्यातील पदे भरण्याची कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
तसेच सीपीटीपी-७ व सीपीटीपी-८ या सरळसेवेच्या तुकडीतील उपलब्ध नायब तहसिलदारांमधून बुलढाणा जिल्ह्यातील काही पदे भरण्याचेही नियोजित आहे.
याशिवाय २०२३ मध्ये होणा-या सार्वजनिक बदल्यांमधून बुलढाणा जिल्ह्यातील रिक्त पदे भरण्यात येतील.
(५) प्रश्न उद्धवत नाही.

---

**अंबाजोगाई ( ता.केज, जि. बीड ) येथे नेटवर्क नसणाऱ्या गावात ऑफलाईन पिक पाहणी करण्याबाबत**

**(२८) ५२०५७ (२९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (ता.केज, जि. बीड) गावात नेटवर्क नाही त्यामुळे ई-पिक पाहणी करता येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नेटवर्क नसणारे उक्त तालुक्यातील राक्षसवाडी, व पिराचीवाडी सह दोन्ही तालुक्यातील बरीचशी गावे नेटवर्क उपलब्ध नसणारी आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी ऑफलाईन पिक पाहणी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
तथापि,ई-पीक पाहणी ॲपमध्ये शेतक-यांचे नांव नोंदणी करणेसाठी मोबाईल नेटवर्कची आवश्यकता असते. परंतु प्रत्यक्षात उभ्या पिकांचे पीक पाहणी करताना नेटवर्कची आवश्यकता नाही. शेतकरी स्तरावरील पिक पाहणी ही शेतामध्ये मोबाईल नेटवर्क नसताना ऑफलाईन देखील केली जाऊ शकते.

(२) व (३)

अशा आशयाचे निवेदन मा.मंत्री (महसूल) यांचेकडे दिनांक १९.१०.२०२२ रोजी प्राप्त झाले आहे. तथापि, ई-पीक पाहणी मोबाईल ॲपमध्ये पिक पाहणीची नोंद करण्यासाठी शेतामध्ये मोबाईल नेटवर्क नसतानाही (ऑफलाईन पध्दतीने) आपल्या पिकाची नोंद करता येते. ऑफलाईन पध्दतीने पीक पाहणी नोंदविण्याची सुविधा मोबाइल ॲपमध्ये सूरुवातीपासूनच उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्धवत नाही.

---

## करजगाव-शिरजगाव कसबा (जि.अमरावती) येथील रोजगार सेवकाने वृक्षलागवडीकरिता मजुरीत गैरव्यवहार केल्याबाबत

**(२९) ५२११४ (२३-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करजगाव-शिरजगाव कसबा (जि.अमरावती) येथील रोजगार सेवकाने वृक्षलागवडीकरिता १५ मजुरांच्या मजुरीत गैरव्यवहार केल्याचे दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामावर असलेल्या मजुरांना शिवीगाळ करणे, हीन वागणूक देणे, बनावट मजूर दाखविणे असे अनेक गैरव्यवहार रोजगार सेवकाने केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार रोजगार सेवकावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२७-०२-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) वृक्ष लागवड या कामाकरीता जे मजूर कामावर होते त्यांच्याच बँक खात्यावर ऑनलाईन मजुरीची रक्कम अदा करण्यात आलेली आहे. तसेच रोजगार सेवकाने बनावट मजूर दाखवून गैरव्यवहार केलेला नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## नागपूर येथील ब्रिटीश कालीन राज्य स्तरीय मध्यवर्ती संग्रहालयाची इमारत मोळकळीस आल्याबाबत

**(३०) ५२२३८ (२९-०१-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील ब्रिटीश कालीन राज्य स्तरीय मध्यवर्ती संग्रहालयाची इमारत मोळकळीस आली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संग्रहालयामध्ये सनातन धर्माचे १६ संस्कार दर्शविणारे शिल्पाकृती संग्रहालयात विनावापरात पडलेले असून पुरातन काळातील प्रतिकृतींचा व इतर कलाकृतींचे जतन करण्यासाठी आवश्यक असलेल्या सोई सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्या, उपरोक्त कारणांमुळे सदर मध्यवर्ती संग्रहायालास भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या अत्यंत अल्प प्रमाणात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर संग्रहालयाच्या इमारतीचा पुर्नविकास करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली व करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

या संग्रहालयाची इमारत १६० वर्षे जूनी असल्याने काही ठिकाणी छताची दुरावस्था झालेली आहे. तसेच विद्युत जोडणी कालबाह्य झालेली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सनातन धर्माचे सोहळा संस्कार दर्शविणाऱ्या शिल्पकृती संग्रहालयाच्या तत्कालीन अभिरक्षक यांनी बनवून घेतल्या होत्या. संग्रहालयाच्या इमारतीच्या छताचे जतन दुरुस्तीनंतर प्रदर्शित दालन विकसित करतेवेळी तत्कालीन अभिरक्षकांनी पुरातन वस्तुंचा प्रामुख्याने विचार करुन दालने विकसित केलेली आहेत. यास्तव मातीच्या बनवून घेतलेल्या सोळा संस्कार दर्शविणाऱ्या शिल्पकृती भांडारगृहात ठेवण्यात आल्या आहेत, जिथे जागेअभावी संग्रहालयीन अप्रदर्शित वस्तू ठेवण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट विश्वेश्वरय्या नॅशनल इस्टिट्युट ऑफ टेक्नालॉजी या संस्थेमार्फत करुन घेण्यात येत आहे तसेच, इमारतीच्या छताच्या दुरुस्तीसाठी वास्तुविशारदाच्या नेमणूकीसाठी ई-निविदा अंतिम टप्प्यात आहे.

---

**बीड जिल्ह्यात प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये बदल होण्याबाबत**

**(३१) ५२२४० (२३-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात प्रधानमंत्री पिक विमा योजनेमध्ये अग्रेसर असून सन २०२१ च्या तुलनेत सन २०२२ मध्ये वा त्यादरम्यान विमा धारकांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली असून अर्जदारांची संख्या ४२%, क्षेत्र ४१% व विमा संरक्षित रक्कम ६९% अशी मोठी वाढ दिसून येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मोर्चे आंदोलने, वारंवार विविध मागण्यांमुळे तसेच मार्गदर्शक सूचनाच्या मर्यादा लक्षात घेता, त्या आंदोलनांचा प्रशासनावर वारंवार ताण येत असून मार्गदर्शक सूचनामध्ये शेतकऱ्यांकरिता कालानुरुप काही बदल देखील गरजेचे आहे, तसेच पदे रिक्त असल्याने शेतकऱ्यांची संख्या अपुरी पडून पर्जन्य खंडाचा विविध पिकांवर वेगवेगळा परिणाम होतो, त्यामुळे सोयाबीन पिकांसाठी विशेष विचार होणे गरजेचे आहे, या सर्व बाबींचा विचार करता योजनेत सुटसुटीतपणा येण्याकरिता मार्गदर्शक सूचनांमध्ये एकूण ५ मुद्यांद्वारे बदल करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी प्रधान सचिव (कृषी), मंत्रालय, मुंबई यांना प्रस्ताव सादर केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात ८०% जमीन हलक्या भुरकट डोंगर भागातील असून या जमिनीची जलधारणा क्षमता अत्यंत कमी असल्यामुळे जिल्हाधिकारी, बीड यांनी सुचविल्याप्रमाणे मार्गदर्शक सूचनामध्ये बदल करुन योजनेच्या शासन निर्णय निर्गमित करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य व प्रधान सचिव, कृषी विभाग यांच्याकडे दिनांक २६ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०१-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) प्रधानमंत्री पिक विमा योजना ही केंद्र शासनाची योजना असुन केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनूसार खरीप हंगाम २०१६ पासुन राज्यात राबविण्यात येत आहे. सन २०२१-२२ मध्ये राज्यात केंद्र शासनाने प्राधिकृत केलेल्या विमा कंपन्यांमधुन ई-निविदा पद्धतीने जिल्हा समूहासाठी योजना कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून निवड केलेल्या विमा कंपनीमार्फत राज्यात राबविण्यात येत आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या तक्रारी व योजना राबविताना येणाऱ्या अडचणी इ. बाबी विचारात घेवून सदर योजनेच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये बदल करण्याबाबतची कार्यवाही केंद्र शासनस्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नोंदणी व मुद्रांक निरीक्षक विभागाच्या सर्व जिल्हयातील अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(३२) ५२४१२ (२९-०१-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नोंदणी व मुद्रांक निरीक्षक विभागाच्या सर्व जिल्हयातील कार्यालयांमध्ये लिपिकापासून ते दुय्यक निबंधक श्रेणी एक पदाची अनेक पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे प्रभारी कार्यभार घेतलेल्या लिपिकांसह अधिका-यांनी दस्तनोंदणी करतांना नियमाचे उल्लंघन करुन बेकायदा पध्दतीने दस्त नोंदणी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२७-०२-२०२३) :** (१) व (२ ) हे खरे आहे.

राज्यातील नोंदणी व मुद्रांक विभागाच्या सर्व जिल्हयांमध्ये सह दुय्यम निबंधक,वर्ग-२ व दुय्यम निबंधक, श्रेणी-१ व लिपीक संवर्गातील पदे मोठया प्रमाणावर रिक्त होती. सह दुय्यम निबंधक, वर्ग-२ व दुय्यम निबंधक श्रेणी-१ संवर्गातील रिक्त पदांचा पदभार नियमानुसार लिपिकांकडे सोपविण्यात आला होता. दस्तनोंदणी करताना काही प्रभारी दुय्यम निबंधक म्हणून कार्यभार सोपविलेल्या लिपिकांकडून व अन्य नियमित दुय्यम निबंधकांनी दस्तनोंदणीमध्ये अनियमितता केल्याचे आढळून आले आहे.

(३) होय,

रेरा कायद्याचे उल्लंघन करुन नोंदविलेल्या दस्ताबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने तपासणी पथ गठीत केले. सदर तपासणी पथकाने दिलेल्या अहवालानुसार दस्तनोंदणी करताना झालेल्या अनियमिततेस अनुसरुन संबंधिताविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात आली आहे.

नोंदणी व मुद्रांक विभागातील, सह दुय्यम निबंधक, वर्ग-२ संवर्गातील १६४ रिक्त पदे व दुय्यम निबंधक श्रेणी-१ संवर्गातील २२४ रिक्त पदे पदोन्नतीने भरण्यात आलेली आहेत. वरिष्ठ लिपिक संवर्गातील रिक्त पदे व पदोन्नतीमुळे झालेली रिक्त पदे भरण्याकरिता एकूण ३१५ कर्मचा-यांच्या पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे. पदोन्नतीने रिक्त झालेली कनिष्ठ लिपिक संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्यात येणार असून त्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील तलाठ्याची पदोन्नती प्रलंबित असल्याबाबत**

**(३३) ५२६०२ (२९-०१-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील तलाठी व मंडल अधिकारी यांची महसूल प्रशासनाने चौकशी अधिकारी न नेमल्याने प्रकरणे निकाली काढण्यात आली नाहीत त्यामुळे जिल्ह्यातील तलाठ्यांची पदोन्नती प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी जिल्ह्यातील तलाठ्यानी माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सामूहिक रजा आंदोलन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार जिल्हयातील पदोन्नतीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०१-०३-२०२३) :**(१) हे खरे नाही.

अमरावती जिल्ह्यामध्ये एकूण १२ विभागीय चौकशी प्रकरणे प्रलंबित असून, या सर्व विभागीय चौकशी प्रकरणांत चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

जिल्हाधिकारी अमरावती कार्यालयाच्या स्तरावरून दरमहा राजस्व अधिकारी यांच्या सभेमध्ये चौकशी प्रकरणांचा आढावा घेण्यात येऊन, प्रलंबित चौकशी प्रकरणात साक्षीदाराची तपासणी, फेरतपासणी, उलटतपासणी तसेच इ. बाबी तपासून परीपूर्ण अंतिम अहवाल सादर करून मुदतीत प्रकरण निकाली काढणेबाबत चौकशी अधिकारी यांना निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड यथील किल्ल्यांवरील दुरवस्थेबाबत

**(३४) ५३२३८ (२९-०१-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड (जि.रायगड) किल्ल्यावरील दुरवस्था व श्वानाच्या चौथा-याच्या रक्षणासाठी सुरक्षा रक्षकांकडून ऐतिहासिक ओवरीचा चौकीसारखा वापर करणे, कपडे वाळविणे तसेच स्वच्छतागृह उभारण्यात आल्याचे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, याबाबत माहिती घेवून रायगड किल्ल्यावरील दुरवस्था व गैरवापर दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०२-२०२३) :** (१), (२) व (३) नाही, हे खरे नाही.

प्रश्नाधीन किल्ला हा केंद्र शासनाचा संरक्षित स्मारक असून भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ यांच्या अखत्यारीत येतो. या संदर्भात भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मार्फत चौकशी करण्यात आली असून पोलीस अधिक्षक, रायगड यांचे समवेत किल्ल्याच्या सुरक्षेचा आढावा घेण्यात आला आहे. सदर आढाव्या अंती किल्ल्याच्या सुरक्षेसाठी १६ राज्य पोलीस हवालदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. किल्ल्याच्या समाधी परिसरात सी.सी.टि.व्ही. यंत्रणा बसविण्यात आली आहे, सर्वसाधारण साफसफाईसाठी १७ खाजगी सुरक्षा रक्षक आधीच किल्ल्यावर नियुक्त आहेत. त्याचप्रमाणे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागातर्फे अतिरिक्त सुरक्षा रक्षकांची मागणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तुकडाबंदी संदर्भात अहवाल नोंदणी महानिरीक्षक यांच्याकडून महसूल सचिवांकडे सादर करण्यात आल्याबाबत

**(३५) ५३४६४ (२९-०१-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तुकडाबंदीसंदर्भात निर्गमित केलेल्या परिपत्रकास सर्वच स्तरातून विरोध झाल्यामुळे तुकडाबंदीसंदर्भात वस्तुस्थिती मांडणारा अहवाल नोंदणी महानिरीक्षक यांच्याकडून महसूल सचिवाकडे सादर करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने तुकडाबंदीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे तसेच त्यानुसार गुंठेवारीतील बांधकामांची दस्तनोंदणी सुरु करण्यात येणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) तुकडेबंदी व तुकडेजोड कायदयात झालेल्या सुधारणेनुसार प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राच्या दस्तांची नोंदणी मा.जिल्हाधिकारी किंवा सक्षम प्राधिकारी यांच्या पूर्वपरवानगीने करता येते. तसेच गुंठेवारी नियमितीकरणाचा दाखला संबधित नियोजन प्राधिकरणाकडून देण्यात येत असतो. सदर परवानगी देणे नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रातील बाब नाही. तथापि, गुंठेवारी नियमितीकरण दाखले देण्यात आलेल्या मिळकतीची दस्त नोंदणी नाकारण्यात येत नाही.

शासन मान्यतेनुसार कायदे / नियम यामधील सुधारणा करण्यात येते. तुकडेबंदी व तुकडेजोड कायदयामधील सुधारणा शासन मान्यतेने महसूल विभागाकडून करण्यात आलेली आहे. शासनाकडील प्राप्त आदेशानुसार, महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रिकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१५ मध्ये दिनांक ०१/०१/२०१६ रोजी नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या कलम ८ ब मधील तरतुदी नोंदणी अधिकाऱ्यांना अवगत करणेस्तव नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाने दिनांक १२/०७/२०२१ रोजीचे सर्वसमावेशक असे परिपत्रक निर्गमित केले आहे. सदर परिपत्रकाविरुध्द गोविंद रामलिंग सोलापूरे यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन नं. २१११/२०२२ दाखल केले होते. प्रस्तुत रिट पिटीशनच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ०५/०५/२०२२ रोजी निर्णय पारित केला आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई,औरंगाबाद खंडपीठाचे सदर निर्णयाचे अनुषंगाने नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाने मा.उच्च न्यायालय, मुंबई , औरंगाबाद खंडपीठासमोर दिनांक ६/६/२०२२ रोजी रिव्हयूअर्ज(review application) दाखल केले असून मा.न्यायालयाने सद्य:स्थितीत दिनांक ५/५/२०२२ रोजीच्या निर्णयास स्थगिती दिलेली आहे. भविष्यात न्यायालयीन आदेशानुसार तसेच प्रस्तुत कायदा/नियमात शासनाकडून सुधारणा होवून तसेच प्रस्तुत कायदा/नियमात शासनाकडून सुधारणा होवून तसे आदेश प्राप्त झाल्यास,त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

### बुलढाणा जिल्ह्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या विहिरींना मान्यता मिळत नसल्याबाबत

**(३६) ५३६३१ (२९-०१-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१५ या कालावधीत एकाही नवीन विहिर बांधकामास मान्यता देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत गेल्या चार-पाच वर्षात विहिरींना मान्यता न दिल्याने हजारो शेतकऱ्यांनी अर्ज करुनही त्यांना विहिरीचा लाभ मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे विहिरींना मान्यता देण्याची मागणी दिनांक ३० जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी स्वरुपात केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२७-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) वरिष्ठ भूवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, बुलढाणा यांनी पाणलोट निहाय लक्षांक दिलेला असुन, त्यांना गावनिहाय लक्षांक देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्रातील महसूल खात्यातील मंडळ अधिकारी तलाठी यांच्याकडून कामास विलंब होत असल्याबाबत**

**(३७) ५४२९४ (२९-०१-२०२३). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील महसूल विभागातील सर्व तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि तलाठी कार्यालयामध्ये सात दिवसापेक्षा अधिक काळ नागरिकांची प्रकरणे, अर्ज, निवेदने, चौकशी प्रकरणे व तक्रार अर्ज प्रलंबित ठेवण्याचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसीलदार दौंड, मंडळाधिकारी देऊळगाव राजा व तलाठी देऊळगाव राजा यांच्याकडे अनेक पत्रे, प्रकरणे, अर्ज, तक्रार अर्ज, चौकशीसाठी आलेली प्रकरणे, निवेदने, फेरफार नोंदी अशी सात दिवसापेक्षा अधिक काळ पर्यत किती प्रकरणे प्रलंबित आहेत,

(३) असल्यास, तहसीलदार, दौंड मंडळाधिकारी, देऊळगाव राजे यांना लोकप्रतिनिधिं यांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या पत्रावर कुठलीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सात दिवसापेक्षा अधिक काळ पत्र प्रलंबित ठेवणाऱ्या मंडळाधिकारी देऊळगाव राजा व तलाठी देऊळगाव राजा अधिकारी कर्मचाऱ्यांच्या विरोधात शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०१-०३-२०२३) :**(१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

पुणे जिल्ह्यातील तहसिल कार्यालय दौंड अंतर्गत मंडळ अधिकारी देऊळगाव राजे यांचे कार्यालयाची दप्तर तपासणी केली असता, त्यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण नोंदी २७८६ पैकी २७३३ नोंदी मंजूर केल्या असून, ५३ नोंदी तांत्रिक कारणास्तव रद्द केलेल्या आहेत. जमीन संकलनाकडील चौकशीची ०६ प्रकरणे, हक्कनोंदणी संकलनाकडील चौकशीची ०७ प्रकरणे, २० तक्रारी प्रकरणे व २ साध्या नोंदी प्रलंबित असल्याचे आढळून आलेले आहे.

(३) व (४) मा.लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने, मंडळ अधिकारी देऊळगाव राजे यांना दिनांक १८.११.२०२२ रोजी पत्र व दिनांक २१.११.२०२२ रोजी बजाविण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीशीस अनुसरून संबंधित मंडळ अधिकारी यांनी दिनांक २१.११.२०२२ व दिनांक २५.११.२०२२ रोजी सादर केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने, संबंधित मंडळ अधिकारी देऊळगाव राजे व तलाठी देऊळगाव राजे यांचेविरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ अन्वये विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबाजोगाई (जि. बीड ) हद्दीतील, सोमवंशी आर्य क्षेत्रीय गाडीलोहार, कुणबी मराठा, धनगर समाज स्मशानभूमीसाठी जागा देण्याबाबत**

**(३८) ५४३४८ (२९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई न.प हद्दीतील, सोमवंशी आर्य क्षेत्रीय गाडीलोहार, कुणबी मराठा व धनगर समाज, स्मशानभूमीसाठी शासकीय जमीन देण्याबाबतच्या प्रस्तावात उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई. यांनी मंजुरीसाठी जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे पाठवला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाला मंजुरी देऊन वरील तिन्ही समाजाला स्मशानभूमीसाठी जमीन उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड. यांच्याकडे दिनांक ८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास वारंवार निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०२-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांचे कार्यालयाकडून आदेश क्र २०२२/मशाका/गावठाण,कावि, ई १२६६ दिनांक १६.०१.२०२३ व आदेश क्र.२०२३/मशाका /गावठाण/कावि-ई-५३५३४, दि.१८.०१.२०२३ अन्वये स्मशानभूमीसाठी जमीन उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई, ( जि. बीड) येथील बागवान (मुस्लिम) समाजास जमीन सर्वे. नं. १७ मध्ये दफनभूमी (कब्रस्तान) साठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(३९) ५४३५० (२९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे अंबाजोगाई, येथील सर्वे. नं. १७ मधील १० एक्कर जमीन बागवान (मुस्लिम) समाजाच्या दफनभूमी (कब्रस्तान) साठी उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव मुख्याधिकारी, न.प. अंबाजोगाई. यांनी अ,ब,क,ड प्रपत्रे व मुद्दा क्र. १ ते २६ विहित नमुन्यात भरून तहसीलदार, अंबाजोगाई. यांच्याकडे सादर केला आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील सर्वे. नं. १७ मधील १० एक्कर जमीन बागवान (मुस्लिम) समाजा दफनभूमी (कब्रस्तान) साठी उपलब्ध करून देण्याबाबत प्रस्ताव मंजुरीसाठी जिल्हाधिकारी, बीड. यांच्याकडे सादर करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तहसीलदार, अंबाजोगाई. यांच्याकडे दिनांक १३ ऑक्टोंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) तहसीलदार, अंबाजोगाई यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींची मागणी दिनांक २०.०९.२०२२ रोजी प्राप्त झाली आहे.
(३) तहसीलदार, अंबाजोगाई यांचे कार्यालयाचे पत्र क्र.२०२२/जमा-२/ दफनभुमी/ कावि/ दिनांक २१.१०.२०२२ अन्वये उप अधीक्षक भूमि अभिलेख, अंबाजोगाई व वन परिक्षेत्र अधिकारी, परळी वै यांचेकडून मोजणी नकाशा व नाहरकत प्रमाणपत्राची मागणी केली आहे. तथापि, दोन्ही कार्यालयाकडून अदयाप माहिती अप्राप्त आहे. उक्त माहितीअभावी पुढील कार्यवाही प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाळीसगाव (जि.जळगांव) येथे मोसंबी व कागदी लिंबू संशोधन व तंत्रज्ञान केंद्र मंजुर होण्याबाबत

**(४०) ५४५९० (२४-०१-२०२३). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव (जि.जळगाव) येथे मोसंबी व कागदी लिंबू संशोधन व तंत्रज्ञान केंद्र मंजुर करण्याबाबतच्या महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या दिनांक १३ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास कृषी परिषद कार्यालय, पुणे येथे झालेल्या ९० व्या बैठकीत सदर केंद्र निर्मितीच्या प्रस्तावावर ठराव पारित करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संशोधन केंद्रासाठी रुपये ८५८.९८ लक्ष खर्चाच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ जुलै, २०२२ रोजीच्या पत्रान्वये उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार कृषी व प.दु.म. विभागाच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना त्यांच्या अभिप्रायासह तत्काळ अहवाल शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे आहे.

चाळीसगाव (जि.जळगाव) येथे मोसंबी व कागदी लिंबू संशोधन केंद्र स्थापन करण्याबाबतचा एकूण रु.१२६२.७४ लाख इतक्या रकमेचा सुधारीत प्रस्ताव महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी शासनाकडे शिफारस केली आहे. त्यानुसार चाळीसगाव येथे मोसंबी व कागदी लिंबू संशोधन केंद्र मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रस्तावित करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्ह्यातील वृद्ध कलावंतांना मानधन मिळण्याबाबत**

**(४१) ५४६६२ (२९-०१-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्ह्यातील वृद्ध कलावंतांनी मानधन मिळावे, यासाठी संबंधित विभागाकडे प्रस्ताव जमा केले असून, सदर प्रस्तावांची छाननी सुमारे चार वर्षांपासून झालीच नसल्याचे दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावांची छाननी करून वृद्ध कलावंतांना तातडीने मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केले वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे. सन २०१८-१९ करीता सप्टेंबर, २०१९ मध्ये सन्मानार्थींची निवड झाल्यानंतर निवड समिती अस्तित्वात नसल्याने त्यानंतरच्या प्रस्तावांवर निर्णय होऊ शकला नाही.
(२) समिती गठीत करणेबाबत संबंधितांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे. समिती गठीत करण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**विक्रमगड, डहाणू, जव्हार, मोखाडा व तलासरी (जि.पालघर) येथील आदिवासी ग्रामीण भागात रोजगार हमी योजनेची कामे सुरु करण्याबाबत**

**(४२) ५४७७५ (२९-०१-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रमगड, डहाणू, जव्हार, मोखाडा, तलासरी (जि.पालघर) येथील रोजगार हमी कायद्यानुसार मागेल त्याला काम देणे बंधनकारक असताना दुर्गम भागातील वंचित घटकातील आदिवासी कुटुंबांना हाताला रोजगार नसल्याने रोजगारासाठी शहरातील पालघर, भिवंडी, ठाणे, वसई-विरार, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली तसेच थेट गुजरात अशा मोठ्या शहरात बांधकाम व्यावसायिक मजूर, नाका कामगार, किरकोळ काम करणारे मजूर, बिगारी, गवंडी, गवत कापणी, वीटभट्टी यासारख्या मोलमजूरीच्या कामासाठी डोक्यावर बिऱ्हाड घेऊन रोजगारासाठी हजारो आदिवासी कुटुंबांचे शहरी भागात स्थलांतर होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा प्रशासनाकडून रोजगार हमी योजना व इतर योजनेतून कामगारांना कामे उपलब्ध होत नसल्याने रोजगार हमी योजनेची कामे तात्काळ सुरु करण्याबाबत मागणी स्थानिक जनतेतून तसेच बेरोजगारांकडून व स्थानिक लोकप्रतिनिधीकडून वारंवार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने आदिवासी ग्रामीण भागात रोजगार हमी योजनेची कामे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२७-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
पालघर जिल्ह्यामध्ये विविध कारणास्तव नजीकच्या शहरात आदिवासी कुटुंबाचे स्थलांतरण झालेले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) पालघर जिल्ह्यात सन २०२२-२३ या चालू आर्थिक वर्षात ७३१७८ आदिवासी कुटुंबांना ३८५९००० मनुष्यदिवस काम देण्यात आले आहे. पालघर जिल्ह्याला शासनाने एकूण मनुष्यदिवस निर्मिती उद्दिष्ट ४४.०४ लक्ष दिले होते. त्यापैकी ४१.३० लक्ष (९३.७९%) इतके लक्षांक जानेवारी, २०२३ अखेर साध्य केले आहे. तसेच, पालघर जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत दिनांक १ एप्रिल, २०२२ पासून ११०.०३ कोटी इतका निधी मजूरांच्या मजुरीवर खर्च करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृषी सेवक भरती परिक्षा २०१९ अंतर्गत भूकंपग्रस्त प्रवर्गातील पदांची भरती प्रलंबित असल्याबाबत**

**(४३) ५४७९१ (२४-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्यावतीने कृषी सेवक भरती २०१९ मधील भूकंपग्रस्त प्रवर्गासाठी असलेल्या राखीव जागेवरील नियुक्ती प्रक्रीया प्रलंबित असल्याने सदर प्रकरणाची चौकशी करून नियुक्ती करण्याबाबत कार्यवाही करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, औसा यांनी सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व भूकंपग्रस्त प्रवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०२-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) अमरावती विभागांतर्गत सन २०१९ मध्ये कृषि सेवक भरती प्रक्रीया राबविण्याबाबत नॉन पेसा क्षेत्राअंतर्गत एकूण १९७ पदांची जाहिरात विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती यांचे कार्यालयाकडून दिनांक ०३.०१.२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीमध्ये भुकंपग्रस्त समांतर आरक्षणाची एकूण ५ पदे दर्शविण्यात आली होती. कृषि सेवक भरती प्रक्रीया सन २०१९ च्या जाहिरातीमध्ये नमूद केल्यानुसार सदर जाहिरात ही संभाव्य रिक्त होणाऱ्या पदांना विचारात घेऊन प्रसिध्द करण्यात आल्याने पदसंख्येत संभाव्य बदलांबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या. संभाव्य रिक्त होणारी पदे प्रत्यक्षात रिक्त नसताना सुध्दा अतिरीक्त उमेदवारांचा समावेश निवडयादीत करुन त्यानुसार निवडयादी तयार करण्यात आल्यामुळे वेगळी प्रतिक्षायादी तयार करण्यात आली नाही.
त्यानुसार सदर भरतीप्रक्रीयेअंती ५ उमेदवारांची भूकंपग्रस्त प्रवर्गातून निवड करण्यात आली. यापैकी ४ उमेदवारांचे पदस्थापनेचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. उर्वरीत एक उमेदवार कागदपत्र पडताळणी करीता दोन वेळा कळवूनही अनुपस्थित राहिल्याने त्याचे पदस्थापनेचे आदेश निर्गमित करता आलेले नाहीत. याच कालावधीत निवडयादीची कालमर्यादा दिनांक ०६.०१.२०२१ रोजी संपुष्टात आली. त्यामुळे वेगळी प्रतिक्षायादी नसल्याने व

निवडयादीची मुदत संपुष्टात आल्याने भूकंपग्रस्त प्रवर्गातील एका पदावर पदस्थापना देण्याबाबत विचार करण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर येथील बल्लारपूर वनपरिक्षेत्रात मजुरांना मजुरी देणे बंधनकारक असतानाही वन विभागाकडून अत्यल्प मजुरी देण्यात येत असल्याबाबत

**(४४) ५४८८१ (२५-०१-२०२३). श्री0मती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर वनपरिक्षेत्रात रोपणाचे काम करणाऱ्या मजुरांना शासनाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे मजुरी देणे बंधनकारक असतानाही वन विभागाकडून अत्यल्प मजुरी देण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वनमुजरांना अत्यल्प मजुरी तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी बल्लारपूर यांच्या शासकीय खात्याद्वारे मजुरांच्या बँक खात्यात मजुरी वितरित न करता चैतन्य आणि प्रतिकिशोर नामक मंजुर संस्थेच्या नावाने मजुरी देण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने चौकशी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही,
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.
सदर प्रकरणी, चांदा वनविभाग, चंद्रपूर यांचे कार्यालयामार्फत चौकशी करण्यांत आली असून मजुरांना अत्यल्प दराने मजुरी देण्यात आलेली नाही. तसेच वन विभाग, परिपत्रक क्र. वनम /२०१३/ प्र.क्र.३३४/फ-९, दि.११ नोव्हें, २०१६ मधील तरतूदीनुसार चैतन्य व प्रतिकिशोर नामक मजूर संस्थेच्या मार्फत मजुरांना मजुरी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यात आत्माअंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत

**(४५) ५४९७९ (२७-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध योजना राबविण्यासाठी व त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन व कृषी विभागाच्या विस्तार विषयक कार्यक्रमास सहाय्य करण्यासाठी प्रत्येक जिल्हा व तालुकास्तरावर कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत सन २०१० पासून मानधनावर कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त कर्मचा-यांना नियमित सेवेत घेण्याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, औसा यांनी कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे सप्टेंबर-आक्टोबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२८-०२-२०२३) :** (१) होय, खरे आहे.
(२) होय, खरे आहे.

(३) कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेवगाव (जि. अहमदनगर) येथील श्रीराम मंदिर ट्रस्टच्या भूखंडावरील भाडे पट्टावर देण्यात आलेल्या अनधिकृत परमिट रूम व बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(४६) ५५५६८ (२९-०१-२०२३). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेवगाव (जि. अहमदनगर) येथील श्रीराम मंदिर ट्रस्टच्या गट क्र.१३१३, १३१४ व १३१५ या भूखंडावरील भाडेपट्टा कराराने करण्यात आलेल्या अनधिकृत परमिट रूम व बांधकामे निष्कासित करण्याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी यांचेकडून अध्यक्ष, श्रीराम मंदिर ट्रस्ट शेवगाव यांना सादर करून कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीराम मंदिर ट्रस्ट न्यास हा धार्मिक स्वरूपाचा असल्याने देवस्थानचे पावित्र्य राखण्याच्या दृष्टीने देखील उक्त ट्रस्टची जागा ही कोणताही उल्लेख आपल्या दप्तरी न करता परमिट रूम करिता भाडेपट्टा करारावर देण्यात आले असून भूखंडावरील भाडे पट्टावर देण्यात आलेल्या परमिट रूम व बांधकामे हे अनधिकृत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बांधकामे निष्कासित करण्याबाबत महसूल विभाग, शेवगाव नगरपरिषद, धर्मादाय आयुक्त कार्यालय, अहमदनगर यांच्याकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही,

४)असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०२-२०२३) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) (३) व (४)

मौजे शेवगांव, ता.शेवगांव येथील गट नं.१३१३, गट नं. १३१४, गट नं. १३१५ देवस्थन दनाम वर्ग ३ च्या जमीनी आहेत.श्रीराम देवस्थान ट्रस्ट यांनी सदर जमीन त्यांचे स्तरावरून संबंधित यंत्रणेची मान्यता न घेता परस्पर भाडेपट्टयाने दिली असल्याचे दर्शनास आले. त्यामुळे गट नं.१३१३, गट नं. १३१४, गट नं. १३१५ वरील फेरफार क्र. २९०१,२९०२ भाडेपट्टा फेरफाराबाबत घेण्यात आलेल्या फेरफार नोंदी फेरफार क्र. ३७३६३, दिनांक १२.२.२०२० अन्वये रद्द करण्यात आलेल्या आहेत.

तसेच, अपर जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दिनांक ५.९.२०२२ व तहसिलदार, शेवगांव यांनी दिनांक ९.९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये श्रीराम ट्रस्टचे गट नं. १३१३, १३१४, व १३१५ वरील अनधिकृत भोगवटादारांना निष्कासित करणेबाबत कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) येथे वरिष्ठ सहाय्यक तथा प्रभारी सह दुय्यम निबंधक वर्ग-२ यांची अनियमिततेची चौकशी होण्याबाबत

**(४७) ५५५८२ (२९-०१-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथे सह जिल्हानिबंधक कार्यालय, बीड अंतर्गत वरिष्ठ सहाय्यक या पदावर (श्री.गोपवाड) हे कार्यरत असून त्यांच्याकडे प्रभारी सह दुय्यम निबंधक वर्ग-२ गेवराईचा अतिरिक्त स्वरुपात कार्यभार सोपविण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये त्यांनी नातेवाईकांच्या व कुटुंबातील इतर सदस्यांच्या नाव व पदाचा गैरवापर करुन बेकायदेशीररित्या जमिनी खरेदी व भूखंड घेतल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा सर्व प्रकारचे गैरव्यवहार व अनियमिततेची तसेच आर्थिक हितसंबंधाची शासनाने वा महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांनी महसूल अधिनियमांतर्गत तसेच शासनाच्या धोरणानुसार खातेनिहाय चौकशी करुन त्यांना कोणत्याही स्वरुपाचा पदभार देवू नये अशी तक्रार वजा मागणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ८ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणावर शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय,
स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अंबाजोगाई व गेवराई याठिकाणी श्री. गोपवाड यांनी नोंदविलेल्या दस्तांची तपासणी करणेकरीता सह जिल्हा निबंधक वर्ग-१ बीड यांनी २ तपासणी पथके गठीत केली होती. तपासणी पथकाने दिलेल्या अहवालानुसार श्री.गोपवाड यांनी नोंदविलेल्या दस्तांपैकी न्युन मुद्रांकित दस्तांची महसूली तुटीची वसुलीची कार्यवाही महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम कलम ३२अ व ३३अ नुसार पूर्ण केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तुकडाबंदीचे शासनाचे परिपत्रक औरंगाबाद खंडपीठाने रद्द ठरविल्यानंतरही वाशिम जिल्हयात मालमत्ता खरेदी विक्रीचे व्यवहार घटल्याबाबत

**(४८) ५५५८७ (२९-०१-२०२३). श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी)** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एखाद्या जमिनीचे क्षेत्र दोन एकर असेल तर त्यातील एक ते तीन गुंठे जागा विकत घेता येत नाही किंवा त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागणार यासह इतर नियम व अटी लावलेले शासनाचे १२ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास तुकडाबंदीचे परिपत्रक मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास रद्द ठरविले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अ-कृषी जमिनी वगळता इतर सर्व घरे, जागांच्या खरेदी खताची नोंदणी सुरू होणे अपेक्षित असताना देखील एकट्या वाशिम जिल्ह्यात मालमत्ता खरेदी विक्रीचे व्यवहार ३० टक्क्यांनी घटल्याची माहिती आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मालमत्ता खरेदी विक्री संदर्भात शासनाचे सुधारित परिपत्रक न आल्याने शेती असूनही व्यवहार करता येऊ शकत नसल्याने मुला-मुलींचे लग्न करण्यात शेतकऱ्यांना मोठी अडचण येत आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मालमत्ता खरेदी विक्री संदर्भात सुधारित परिपत्रक काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०२-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.
मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठाचे दिनांक ०५ मे २०२२ चे निर्णयाचे अनुषंगाने नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाने मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठासमोर दिनांक ०६/०६/२०२२ रोजी रिव्हयू अर्ज २४६/२०२२(review application) दाखल केला आहे.
सदर रिव्हयू अर्जावर सुनावणीची प्रक्रीया चालू आहे तोवर दिनांक ०५/०५/२०२२ रोजीच्या निर्णयाप्रमाणे दस्त नोंदणी न करणेबाबत मा. न्यायालयाने आदेशित केले आहे. सदरच्या आदेशाचा अंमल अदयापि सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

वाशिम जिल्हयात खरेदीखत दस्ताची नोंदणी सुरु असुन, सन २०२० मध्ये २२०३८ दस्तांची नोंदणी झाली आहे. सन २०२१ या वर्षात २४३९८ दस्तांची नोंदणी झालेली असून सन २०२२ मध्ये २२४३९ दस्त नोंदविले आहे. त्यामुळे दस्त नोंदणीमध्ये ३०% घट झाल्याचे निदर्शनास येत नाही.

(३) हे खरे नाही.

प्रमाणभूत क्षेत्रांच्या मिळकतींचे शेत जमिनीच्या दस्तांची नोंदणी करण्यात येत आहे.

(४) भविष्यात न्यायालयीन आदेशानुसार तसेच प्रस्तुत कायदा/नियमात शासनाकडून सुधारणा झाल्यास, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

### सोलापुर जिल्ह्यातील अनेक हॉटेलमधुन विना परवाना दारु विक्री सुरु असल्याबाबत

**(४९) ५६०५९ (२९-०१-२०२३). श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापुर जिल्ह्यातील अनेक हॉटेलमधून विना परवाना दारु विक्री सुरु असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विभागाने आतापर्यंत विना परवाना दारू विक्री करणाऱ्या एकूण किती हॉटेलवर कारवाई केली आहे,

(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात विना परवाना दारू विक्री होत असून उत्पादन शुल्क विभागाने त्याकडे दुर्लक्ष करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त जिल्ह्यातील हॉटेलांमध्ये विना परवाना दारू विक्री करणाऱ्या सर्व हॉटेलांची तपासणी करून विना परवाना दारू विक्री हॉटेलवर करवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (०१-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) विना परवाना मद्यविक्री केली जात असल्याचे निदर्शनास आल्याने अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर यांच्या अधिनस्थ कार्यालयामार्फत माहे एप्रिल, २०२२ ते माहे नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत एकूण १३३ हॉटेल/ ढाबा आस्थापनेविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) विनापरवाना मद्यविक्री करणा-या हॉटेल /ढाब्यांवर सातत्याने कारवाई केली आहे व करण्यात येत आहे.

(४) सोलापूर जिल्ह्यात एप्रिल, २०२२ ते नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत विना परवाना /अवैधपणे मद्यविक्री करणा-या १३३ हॉटेल /ढाबा आस्थापनेवर वेळोवेळी कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये एकूण १८७ आरोपींना अटक करण्यात आली असून रुपये ३.८८ लक्ष किंमतीचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. मा. न्यायालयाने १३ प्रकरणात हॉटेल /ढाबा चालक/मालक यांना प्रत्येकी रुपये ५०,०००/- व मद्यपींना रुपये ५०० ते रुपये ५००० पर्यंत इतका दंड ठोठावला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात जालनासह नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना मिळणारा लाभ बंद केल्याबाबत

**(५०) ५६४६१ (२९-०१-२०२३). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जालनासह नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना बंद पडण्याच्या मार्गावर असून सदर योजनेंतर्गत शेतकऱ्यांना मिळणारा लाभ बंद केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत चांगले काम झालेले असतानाही अनेक सुविधा बंद केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच मराठवाडा-विदर्भ मधील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना हा प्रकल्प जागतिक बँकेकडून कर्ज घेऊन सुरु केला असूनही तो बंद पडला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विविध योजना शासन पुन्हा सुरु करुन शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२८-०२-२०२३) :** (१) नाही, अशी बाब नाही,
(२) अशी बाब नाही. पंपसंच, पाईप, यांत्रिकीकरण, नवीन विहीर, शेळीपालन खाजगी जमिनीवरील सामुदायिक शेततळी या वैयक्तीक लाभाच्या घटकांचे अर्ज लक्षांकापेक्षा जास्त प्राप्त झाल्याने नवीन अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया दिनांक २७ फेब्रुवारी,२०२० पासून संस्थगित करण्यात आली आहे.
(३) नाही, अशी बाब नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.